**निवडणूक मंडळ महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे**
**पंचवार्षिक निवडणूक २०२६ ते २०३१**

**टपालाने मतपत्रिका प्राप्त न झालेल्या आजीव सभासदांसाठी दुबार मतदान पद्धती**

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे च्या पात्र व मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट असलेल्या ज्या आजीव सभासदांना, परिषदेच्या सध्या चालू असलेल्या निवडणूक प्रक्रियेची मतपत्रिका पोस्टाने मिळाली नसल्यास, संबंधित आजीव सभासदांना मसाप च्या मतदानकेंद्रावर प्रत्यक्ष येऊन मतदान ( दुबार ) करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
दुबार मतदान प्रक्रिया दि. ४,५ आणि ६ मार्च २०२६ या दिवशी सकाळी ११ ते दुपारी १ आणि दुपारी २ ते ४ पर्यंत मसापच्या कार्यालयात आयोजित करण्यात येईल. यासंदर्भातील नियमावली पुढीलप्रमाणे:

१. टपालाने मतपत्रिका न मिळाल्यास संबंधित आजीव सभासदानी स्वतः, निवडणूक मंडळाकडे, वरिल निर्देशित कालावधीतच मसाप निवडणूक मंडळाच्या पुणे येथील कार्यालयामध्ये, आपल्या आधार कार्डाच्या स्वसाक्षांकित प्रतीसह, अर्ज करावा.

२. या अर्जामध्ये मतपत्रिका उपलब्ध न होण्याचे / मिळण्याचे कारण स्पष्टपणे नमूद करावे.

३. अशा दुबार मतदानासाठी आलेल्या विनंती अर्जाची, निवडणूक कार्यालय, उपलब्ध कागदपत्रांवरून खात्री करेल.

४. पूर्ण शहानिशा केल्यानंतरच, संबंधित आजीव सभासदास लागू असलेल्या दुबार मतपत्रिका दिल्या जातील व त्याची नोंद रजिस्टर मध्ये करून अशा सभासदाची सही घेतली जाईल.

५. दुबार मतपत्रिका प्राप्त झाल्यानंतर निवडणूक कार्यालयामध्ये उभारलेल्या मतदान नोंदणी कक्षामध्ये जाऊन, असा सभासद पूर्ण गोपनीय पद्धतीने मतदान करेल. मतपत्रिका मतदान केंद्राच्या बाहेर नेण्यास वा अन्य कुणालाही दाखवण्यास सक्त मनाई आहे.

६. मतदान करून सदर सभासद ही मतपत्रिका निवडणूक कार्यालयामध्ये उपलब्ध केलेल्या मतपेटीमध्ये स्वहस्ते टाकेल.

७. अशाप्रकारे दुबार मतदान, बुधवार दिनांक ४ मार्च ते शुक्रवार दिनांक ६ मार्च २०२६ दरम्यान करता येईल. दुबार मतदानाची वेळ सकाळी ११ ते दुपारी १ आणि दुपारी २ ते ४ अशी राहील. शुक्रवार दिनांक ६ मार्च २०२६ च्या नंतर मतदानासंदर्भात कोणत्याही प्रकारचा विनंती अर्ज स्वीकारला जाणार नाही. याची सक्त नोंद घ्यावी.

९. अशा प्रकारे दुबार मतदानासाठी आलेल्या अर्जावर व या निवडणूक प्रक्रियेबाबत, निवडणूक मंडळाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

**ॲड. प्रताप परदेशी.  श्री संजीव खडके.  श्री गिरीश केमकर**
**(नावे योग्यप्रकारे टाकणे)**
**निवडणूक मंडळ**